मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

## दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट व्हिजन चष्म्यांचे वितरण व कार्यशाळा

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय येथे दिनांक 21 फेब्रुवारी 2025 रोजी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड, रोटरी क्लब ऑफ मद्रास ईस्ट, SHG टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड आणि हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन व देवगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोजित दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट दृष्टी अंतर्गत कार्पोरेट सामाजिक बांधिलकी कार्यक्रमांतर्गत इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड च्या वतीने 24 लाख किंमतीचे अंध विद्यार्थ्यांसाठी मोफत 150 स्मार्ट व्हिजन चष्मा वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मशिप्र मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा.श्री. त्रिंबकराव पाथ्रीकर तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. श्री. विवेक जयस्वाल उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. संजीव रंजन वरिष्ठ व्यवस्थापक, इंडियन ऑइल कार्पोरेशन, श्री. इकबाल सिद्दिकी, उपव्यवस्थापक एलपीजी, श्री. मोहम्मद इब्राहिम एस एच जी टेक्नॉलॉजी, श्री.निवास राव पूर्व मद्रास रोटरी क्लब, श्री. धीरज कुमार वरिष्ठ व्यवस्थापक इंडियन ऑइल, श्री. विशाल लोडगे इंडियन ऑइल पेट्रोल पंप, श्री. दत्तात्रय कडवे समन्वयक हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रोफेसर अशोक तेजनकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुदेश डोंगरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी अंध विद्यार्थ्यांना महाविद्यालयात आता पर्यंत विविध सॉफ्टवेअर, ब्रेल टाईपराईटर, ध्वनिफिती अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्यात येते तसेच दृष्टिहीन विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येते याची माहिती दिली.

### महाविद्यालयात दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सोयीसुविधा

आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने डोळस विद्यार्थ्यांबरोबरच दृष्टिहीन विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावा म्हणून आपल्या महाविद्यालय ग्रंथालयात दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी साठी ब्रेल मशीन, JAWS, ओपन बुक रीडर आणि स्कॅनिंग, NVDA, लो व्हिजन सॉफ्टवेअर तसेच बहुभाषिक OCR, मॅग्निफायर ग्लास, ब्रेल स्लेट आणि ऑर्बिट डिव्हाइस इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सॉफ्टवेअरच्या मदतीने, दृष्टिहीन विद्यार्थी संगणकावर इंग्रजी आणि मराठीमध्ये त्यांच्या नोट्स तयार करू शकतात. तसेच, संगणकाच्या मदतीने कोणतीही पुस्तके वाचता येतात आणि ते इंटरनेटवरील माहिती वापरू शकतात. तसेच, अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसोबत, स्नेहांकित हेल्पलाइन मुंबईच्या मदतीने दृष्टिहीन विद्यार्थ्यसाठी अभ्यासक्रमाची व स्पर्धा परीक्षेची पुस्तके MP3/ऑडिओ स्वरूपात करून विद्यार्थ्यांच्या मोबाइल च्या मेमरी कार्ड मध्ये देण्याची सुविधा उपलब्ध असून आपल्या महाविद्यालयाच्या दृष्टिहीन प्रवेशित विद्यार्थ्याबरोबरच शहरातील व इतरत्र प्रवेशित दृष्टिहीन विद्यार्थ्यांना ही सेवा देण्यात येत आहे. सध्या आपल्या महाविद्यालय ग्रंथालयात 3600 पुस्तके MP3/ऑडिओ स्वरूपात उपलब्ध करण्यात आली आहेत.

## शै. वर्ष 2024-25 मध्ये महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले दृष्टिहीन विद्यार्थी

| Sr. No. | Name of the Student | Gender | Class | Mobile No. |
|---|---|---|---|---|
| 1 | Pravin Chandance | Male | B.A.F.Y. | 9156971330 |
| 2 | Ajinath Ghuge | Male | B.A.F.Y. | 9373450070 |
| 3 | Samadhan Bhosle | Male | B.A.F.Y. | 9359826848 |
| 4 | Alfiya Sayyad | Female | B.A.F.Y. | 9850801144 |
| 5 | Usha Khadud | Female | B.A.F.Y. | 8605606343 |
| 6 | Ambadas Fufate | Male | B.A.S.Y. | 9529914326 |
| 7 | Yash Wagh | Male | B.A.S.Y. | 9284970698 |
| 8 | Pawan Babirwal | Male | B.A.S.Y. | 9075101335 |
| 9 | Rama Baburao Sonwane | Female | B.A.T.Y. | 8799862136 |
| 10 | Saniya Sayyad | Female | B.A.T.Y. | 9923639674 |
| 11 | Anirudha Pawar | Male | M.A .F.Y. (History) | 9561440938 |
| 12 | Anil Sayar | Male | M.A .F.Y. (History) | 9725423995 |
| 13 | Shailesh Deshmukh | Male | M.A. (Marathi) | 9923875442 |
| 14 | Akash Salve | Male | M.A. F. Y. (Music) | 8623828166 |
| 15 | Prathamesh Mokale | Male | M.A. F.Y. (Music) | 9145653828 |
| 16 | Amol Waghchoure | Male | M.A. F.Y. (Music) | 9359889166 |
| 17 | Gopichand Magar | Male | M.A.F.Y. (Political Sc.) | 7887436860 |
| 18 | Nandkishor Dhotre | Male | M.A.F.Y. (Political Sc.) | 9860335358 |
| 19 | Devanand Landage | Male | M.A.F.Y. (Psychology) | 7756831967 |
| 20 | Pratik Meshram | Male | M.A.F.Y. (Sociology) | 8329821993 |
| 21 | Pralhad Pandav | Male | M.A.F.Y. (Sociology) | 7447303309 |
| 22 | Dnyaneshwar Kakde | Male | M.A.F.Y. (Sociology) | 8380866735 |
| 23 | Digambar Wakle | Male | M.A.F.Y. (Sociology) | 7758073455 |
| 24 | Aniket Dholke | Male | M.A.S.Y. (Music) | 7420981830 |
| 25 | Deepali Kachole | Female | XI Arts | 9272021172 |
| 26 | Tarang Pathrikar | Male | XI Arts | 9960296080 |
| 27 | Ritesh Rajendra Kere | Male | XII Sci. | 9823705300 |

## महाविद्यालयात दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध साहित्य व त्याचा उपयोग

| अ.क्र. | Software /Equipments | संख्या | उपयोग |
|---|---|---|---|
| 1 | ब्रेल मशिन | 2 | ब्रेल लिपीमध्ये लिहिण्यासाठीचे |
| 2 | NVDA Software | 1 | संगणकावर माहिती लिहिण्यासाठी इंग्रजी माध्यमात |
| 3 | JAWS Software | 1 | संगणकावर माहिती लिहिण्यासाठी मराठी माध्यमात |
| 4 | O C R Software | 1 | संगणकावरील बहुभाषिक माहिती वाचनासाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | Open book Reader & Scanning Software | 1 | कुणाच्याही मदती शिवाय संगणकावर पुस्तके वाचुन देण्यासाठी |
| 6 | Low Vision Software | 1 | कमी दृष्टी असल्यास संगणकावरील माहिती मोठी करून वाचनासाठी |
| 7 | Magnifire Glass | 1 | या डिव्हाईच्या साह्याने न्युज पेपर,ग्रंथ,मासिके वाचनासाठी |
| 8 | ब्रेल स्लेटस & स्टायलस | 10 | इतरत्र कुठेही ब्रेल लिपी मध्ये माहिती लिहिण्यासाठी |
| 9 | Orbit Device | 5 | ब्रेल लिपी मध्ये माहिती लिहुन संगणकाच्या साह्याने वाचता येणे तसेच पीडीफ करून प्रिंट काढता येते |

## आपल्या महाविद्यालयाचे नोकरीला लागलेले दृष्टिहीन विद्यार्थी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | शिक्षण | नौकरीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | निकेश मदारे | M.A.His. Phd | श्री.गुरुगणेश अंध विद्यालय जालना |
| 2 | शिवराज मोताळे | B.C.A. | महाराष्ट्र ग्रामीण बँक छ.संभाजीनगर |
| 3 | अलका जाधव | M.A. | महाराष्ट्र ग्रामीण बँक छ.संभाजीनगर |
| 4 | शंकर देवकर | B.A. | महाराष्ट्र ग्रामीण बँक परतुर |
| 5 | अनिल बारबैले | B.A. | सेन्ट्रल रेल्वे मुंबई |
| 6 | बाबासाहेब ठोंबरे | B.A. | GST Office छ.संभाजीनगर |

## दृष्टिहीन विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या स्मार्ट व्हिजन चष्म्याचे प्रमुख वैशिष्ट्ये

**बहुभाषिक समर्थन:** इंग्रजी व्यतिरिक्त भारतात बोलल्या जाणाऱ्या मराठीसह इकून १७ भाषेचा समावेश आहे.

**प्रगत ऑब्जेक्ट डिटेक्शन:** अत्याधुनिक ऑब्जेक्ट डिटेक्शन तंत्रज्ञानाने सुसज्ज, पर्यावरणीय जागरूकता वाढवते.

**अडथळा शोधणे:** प्रॉक्सिमिटी सेन्सर आणि अल्गोरिदमचे एक अद्वितीय संयोजन वापरकर्त्यांना अडथळ्यांबद्दल सतर्क करून, सुरक्षित नेव्हिगेशन सुनिश्चित करून अतिरिक्त सुरक्षितता प्रदान करते.

**हँड्स फ्री सक्रियकरण:** एकदा मोबाइल फोनशी कनेक्ट झाल्यानंतर, फोन वारंवार न उघडता डिव्हाइस वापरले जाऊ शकते.

**चलन शोधणे:** भारतीय आणि कुवेती दोन्ही चलने अचूकपणे शोधू शकते आणि ओळखू शकते, वापरकर्त्यांना आर्थिक व्यवहारांमध्ये सक्षम बनवते.

**ऑफलाइन कार्यक्षमता:** मजकूर वाचन, ऑब्जेक्ट डिटेक्शन आणि अडथळे शोधणे यासह अनेक वैशिष्ट्ये इंटरनेट कनेक्शनशिवाय कार्यक्षमतेने कार्य करतात, कुठेही अखंड मदत सुनिश्चित करतात.

**वस्तू ओळखणे:** वाहने, अडथळे, ट्रॅफिक सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग, फर्निचर आणि बरेच काही शोधते, वापरकर्त्यांना त्यांच्या सभोवतालच्या परिसरात सुरक्षितपणे नेव्हिगेट करण्यास मदत करते.

**लोक ओळखणे:** व्यक्ती ओळखते, अंदाजे वयाचा अंदाज लावते, भाव ओळखते आणि नावे जोडली जातात तेव्हा ज्ञात व्यक्ती ओळखते.

**मजकूर वाचन क्षमता:** पुस्तके, रस्त्यांची चिन्हे आणि अगदी हस्तलिखित हस्तलिखिते वाचते, माहितीच्या प्रवेशासाठी अंतर भरून काढते.

**चलन शोधणे:** भारतीय आणि कुवेती चलने अचूकपणे ओळखते, आर्थिक व्यवहारांमध्ये मदत करते.

**अडथळा शोधणे:** वापरकर्त्यांना सतर्क करून सुरक्षित नेव्हिगेशन सुनिश्चित करते.

**आपत्कालीन कॉलिंग:** आपत्कालीन परिस्थितीत वापरकर्ते फक्त एका टॅपने कॉल करू शकतात.

**छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील एकूण १५० दृष्टीहीन विद्यार्थ्यांना स्मार्ट व्हिजन चष्म्याचे वाटप करण्यात आले.**



**उपस्थित दृष्टिहीन विद्यार्थी व मान्यवर**